दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 21 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 104 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# वैभव नाईकांच्या ‘गद्दारीच्या कलंका’वर निलेश राणेंचा पलटवार; कोकणातील राजकारण तापले

■ कुडाळ : वृत्तसंस्था

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार वैभव नाईक यांनी शिंदे गटाकडून पक्षप्रवेशाची ऑफर मिळाल्याचा दावा करत, “गद्दारीचा कलंक नको म्हणून आमदारकी नको होती” असे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यावर शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनी सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून जोरदार पलटवार केला आहे. निलेश राणे यांनी वैभव नाईक यांच्या वक्तव्याची खिल्ली उडवत, “माझ्यावर गद्दारीचा कलंक नको होता म्हणून मी उबाठा सोडली नाही, हा २०२६ चा सर्वात मोठा विनोद आहे,” अशी बोचरी टीका केली. तसेच, वैभव नाईक यांचा निवडणुकीतील पराभव निश्चित असल्याने त्यांनी शेवटच्या क्षणी निवडणूक अर्ज दाखल केला नाही, असा आरोपही त्यांनी केला.





## ‘निष्ठावान असल्याचा दावा हास्यास्पद’

■ निलेश राणे यांनी पुढे वैभव नाईक यांच्या राजकीय निष्ठेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेसने त्यांच्या कुटुंबाला राजकीय संधी दिल्यानंतरही त्यांनी पक्ष बदलल्याचा दावा करत, “हा कसला निष्ठावान?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. याचबरोबर वैभव नाईक यांची जिल्ह्यातील राजकीय ताकद कमी झाल्याचा दावाही राणे यांनी केला. आपल्या राजकीय प्रभावामुळे वैभव नाईक यांच्या दोन भावांना नगरसेवक होता आले, असा दावाही त्यांनी केला.

## ‘पुढे काही बोलला तर पदाधिकारी उत्तर देतील’

■ आपल्या पोस्टच्या शेवटी निलेश राणे यांनी वैभव नाईक यांना अप्रत्यक्ष इशारा देत, “मी लहान लोकांच्या तोंडी लागत नाही. इथून पुढे काही बोलला तर माझे पदाधिकारी उत्तर देतील,” असे म्हटले आहे. दरम्यान, वैभव नाईक यांनी शिंदे गटाकडून आपल्याला पक्षप्रवेशासाठी अनेकदा संपर्क करण्यात आल्याचा दावा केला होता. लोकसभा निवडणुकीनंतरही भरत गोगावले यांनी आपल्याला फोन केल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच आपण उद्धव ठाकरे यांच्यासोबत असून पुढेही त्यांच्यासोबतच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. वैभव नाईक यांच्या दाव्यानंतर सुरू झालेल्या या शाब्दिक संघर्षामुळे कोकणातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले असून, निलेश राणेंच्या आरोपांना वैभव नाईक काय प्रत्युत्तर देतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# माकपचा वतीने परळीत मराठवाडा विभागीय मेळावा

## अनैतिकता, भ्रष्टाचार व सत्ताकेंद्री राजकारण यावर मंथन

■ परळी / प्रतिनिधी



अनैतिकता, भ्रष्टाचार आणि सत्ताकेंद्री राजकारणाच्या पार्श्वभूमीवर जनतेसमोर नैतिक व लोकाभिमुख राजकीय पर्याय उभा करण्याच्या उद्देशाने भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्यावतीने मराठवाडा विभागीय मेळाव्याचे आयोजन सोमवार, दि. 24 रोजी परळी येथे करण्यात आले आहे. चला राजकारण शुद्ध करूया! या भूमिकेतून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या राजकारणात निवडून आलेले लोकप्रतिनिधी पक्षाच्या विचारधारेपेक्षा सत्तेच्या समीकरणांना प्राधान्य देत वारंवार पक्षांतर करीत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. निवडणुकीपूर्वी एका पक्षाच्या विचारधारेवर आणि चिन्हावर जनतेकडून मत मागून निवडून आल्यानंतर सत्तेच्या सोयीसाठी पक्ष बदलण्याच्या प्रवृत्तीमुळे मतदारांच्या विश्वासाचा प्रश्न निर्माण होत आहे. लोकप्रतिनिधींचे पक्षांतर, सत्तेसाठी होणारी राजकीय तडजोड आणि विचारधारा विरहित राजकारण या वर्तमान राजकीय परिस्थिती विरोधात राज्यपातळीवर विभाग निहाय मिळावे होणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून 24 ऑगस्ट 2026 रोजी मा. गोपीनाथराव मुंडे सभागृह नटराज रंगमंदिर परळी वैजनाथ या ठिकाणी होणाऱ्या मेळाव्यासाठी पक्षाच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य कॉ. अशोक ढवळे, कॉ. मरियम ढवळे,कामगार नेते कॉ.डॉ. डी एल कराड, पक्षाचे राज्य सचिव कॉ.डॉ.अजित नवले आमदार कॉ. विनोद निकोले कॉ. विजय गाभणे या मेळाव्याला मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

राजकारणातील वाढती अनैतिकता, पक्षांतराची प्रवृत्ती आणि सत्ताकेंद्री राजकारणाला पर्याय म्हणून तत्त्वनिष्ठ, लोकाभिमुख आणि जनतेच्या प्रश्नांशी बांधील असलेल्या राजकीय चळवळीची गरज असल्याची भूमिका या मेळाव्यात मांडली जाणार आहे. मराठवाड्यातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी, युवक, महिला, दलित, शोषित, वंचित तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांवर संघर्ष अधिक व्यापक करण्यासाठी संघटनात्मक बांधणी, आगामी आंदोलनांची दिशा आणि जनतेच्या प्रश्नांवरील लढ्याचे नियोजन याबाबतही मेळाव्यात विचारमंथन होणार आहे.

लोकशाही मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय, जनतेच्या प्रश्नांवरील संघर्ष सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणे आणि पक्षांतराच्या राजकारणाला नकार देत नैतिक व तत्त्वनिष्ठ राजकारणाचा पर्याय मजबूत करण्यासाठी मराठवाड्यातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक आणि लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कॉ. अ‍ॅड. अजय बुरांडे, कॉ.पी.एस. घाडगे, कॉ.बब्रुवान पोटभरे,कॉ. रोहिदास जाधव कॉ.बी.जी. खाडे,कॉ.मुरलीधर नागरगोजे,कॉ.सुदाम शिंदे,कॉ. पांडुरंग राठोड, कॉ. किरण सावजी, अ‍ॅड.परमेश्वर गीते, कॉ. प्रकाश चव्हाण आदींनी केले आहे.




# डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळीत ‘निर्भय मॉर्निंग वॉक’ संपन्न

■ परळी / प्रतिनिधी

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १३ व्या शहीद दिनानिमित्त त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यासाठी तसेच त्यांच्या हत्येचा निषेध नोंदविण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आयोजित ‘निर्भय मॉर्निंग वॉक’ शांततेत संपन्न झाला. सकाळी ७ वाजता टावर येथून मॉर्निंग वॉकला सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी अंनिसचे पदाधिकारी, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले.सहभागी नागरिकांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांना उजाळा देत वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि अंधश्रद्धाविरोधी चळवळीचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले.

परळी येथील राणी लक्ष्मीबाई टावर येथून निघालेल्या या मॉर्निंग वॉकचा समारोप परळी येथील रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोर करण्यात आला.

यावेळी अनिसचे पदाधिकारी प्रा विलास रोडे, पी.एस. घाडगे, सुकेशनी नाईकवाडे, संजीब रॉय, नवनाथ दाने, विकास वाघमारे, डॉ. सिद्धार्थ जगतकर, अनिल मस्के, ,बालाजी ढगे, विठ्ठल झिलमेवाड, भगवान राठोड, केशवराज मुंडे, महादेव आजले, दीपक शिरसाठ, राहुल सूर्यवंशी, केशव कांबळे यांच्यासह अधिक कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. या उपक्रमातून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा तसेच निर्भय आणि विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार सहभागी नागरिकांनी व्यक्त केला.

# राज्यातील हवामानात प्रचंड उलटफेर! आज तुमच्या जिल्ह्यात पाऊस पडणार की ऊन पडणार?

■ मुंबई : वृत्तसंस्था



महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मान्सूनचा जोर कमी झाला असून राज्यातील बहुतांश भागात पावसाने उघडीप घेतली आहे. काही ठिकाणी ढगाळ वातावरणासह हलक्या सरी पडत आहेत, तर अनेक भागांत दमट आणि उष्ण हवामान जाणवत आहे. 21 ऑगस्ट रोजी राज्यातील कोणत्याही जिल्ह्याला जोरदार पावसाचा अलर्ट देण्यात आलेला नाही.

कोकण विभागातही पावसाचा जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. 21 ऑगस्ट रोजी कोणताही पावसाचा अलर्ट नसून काही भागांत हलक्या ते मध्यम सरी पडण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवस कोकणात पावसाचा जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. दमट हवामानासोबत काही काळ सूर्यदर्शन होण्याची शक्यता आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत काही ठिकाणी हलक्या सरी पडू शकतात. मात्र, जोरदार पावसाचा कोणताही इशारा देण्यात आलेला नाही. घाटमाथ्यावरील भागातही पावसाचा जोर कमी राहण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात गुरुवारी काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला होता. मात्र, 21 ऑगस्ट रोजी कोणत्याही जिल्ह्याला पावसाचा अलर्ट नाही. छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड आणि लातूर परिसरात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. जोरदार पाऊस नसल्याने या भागातील पावसाची तूट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुबार पेरणी आणि उभ्या पिकांच्या नुकसानीची चिंता शेतकऱ्यांना आहे.

विदर्भातही गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. पुढील काही दिवस बहुतांश भागात कोरडे, दमट आणि उष्ण हवामान राहण्याची शक्यता आहे. एकंदरीत, 21 ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यासाठी जोरदार पावसाचा अलर्ट नाही. पुढील चार ते पाच दिवसही राज्यात मुसळधार पावसाची शक्यता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे आणि पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आईपासून दुरावलेली चार वर्षीय आरोही पोलिसांच्या प्रयत्नांनी सुखरूप घरी

■ लातूर : प्रतिनिधी



देवणी येथील आठवडी बाजारात आईपासून दुरावलेल्या अवघ्या चार वर्षीय आरोहीचा देवणी पोलिसांनी अवघ्या चार तासांत शोध घेऊन तिला सुखरूप वडिलांच्या ताब्यात दिले. मुलीला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी संवेदनशीलता आणि तत्परता दाखवत सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती प्रसारित करून तिच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्यात यश मिळविले.

सायंकाळी चारच्या सुमारास देवणी येथील आठवडी बाजार परिसरात आरोही ही चार वर्षीय मुलगी पोलिसांना हरवलेल्या अवस्थेत आढळून आली. आईपासून दुरावल्यामुळे ती अत्यंत घाबरलेली होती. तिला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिचे नाव, पत्ता किंवा पालकांची माहिती मिळविण्यात अडचणी येत होत्या. देवणी पोलिसांनी तात्काळ मुलीची काळजी घेत तिच्या पालकांचा शोध सुरू केला. मुलीची ओळख पटविण्यासाठी तिचे छायाचित्र आणि माहिती सोशल मीडियाच्या विविध माध्यमांतून प्रसारित करण्यात आली.

मुलीचे वडील अजय चव्हाण अशिक्षित असून त्यांच्याकडे मोबाईल फोनही नसल्याचे समोर आले. मात्र, सोशल मीडियावर प्रसारित झालेली माहिती त्यांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचली. त्यानंतर सायंकाळी आठच्या सुमारास अजय चव्हाण देवणी पोलीस ठाण्यात दाखल झाले. पोलिसांनी आवश्यक पडताळणी करून आरोही ही अजय चव्हाण यांचीच मुलगी असल्याची खात्री केली. त्यानंतर तिला सुखरूप वडिलांच्या ताब्यात देण्यात आले. चार तासांच्या प्रयत्नांनंतर मुलगी पालकांच्या स्वाधीन झाल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

# रोहित शर्माचे जोरदार पुनरागमन; वेस्ट इंडिज मालिकेपूर्वी मुंबईच्या बीकेसी मैदानावर सुरू केला सराव

■ वांद्रे प्रतिनिधी

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा काही काळाच्या विश्रांतीनंतर मुंबईत परतला असून आगामी एकदिवसीय मालिकेसाठी जोरदार तयारीला लागला आहे. ३९ वर्षीय रोहितने मुंबईतील एमसीएच्या वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (BKC) मैदानावर धावण्याचा सराव सुरू केला आहे. त्याच्या या सराव सत्राचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो काही प्रशिक्षकांसोबत कसून मेहनत घेताना दिसत आहे. रोहित शर्मा शेवटचा जुलै महिन्यात इंग्लंडविरुद्ध झालेल्या मालिकेत खेळला होता, जिथे भारताला २-१ ने पराभव पत्करावा लागला होता. या मालिकेनंतर मिळालेल्या महिनाभराच्या विश्रांतीनंतर, आता तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेवर पूर्ण लक्ष केंद्रित करून मैदानात उतरला आहे.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेदरम्यान रोहितचे आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील भवितव्य आणि त्याचे वय यावरून जोरदार चर्चा रंगली होती. निवड समिती तरुण खेळाडूंना संधी देण्याच्या विचारात असल्याचे वृत्त होते, तर काही जणांच्या मते ती त्याची अखेरची मालिका ठरू शकते. मात्र, लॉर्ड्सवर शानदार शतक झळकावून रोहितने आपल्यावरील सर्व शंकांना आणि टीकाकारांच्या तोंडाला सडेतोड उत्तर दिले. या खेळीमुळे त्याच्या कारकिर्दीला आणखी नवी दिशा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, २७ सप्टेंबरपासून भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू होत आहे. बीसीसीआयने अद्याप या मालिकेसाठी अधिकृत भारतीय संघाची घोषणा केलेली नाही, परंतु तज्ज्ञांच्या मते तंदुरुस्त आणि उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेला रोहित शर्माचे संघामधील स्थान जवळपास निश्चित मानले जात आहे. स्वतःला पूर्णपणे तंदुरुस्त ठेवण्यासाठी मुंबईच्या मैदानांवर नेहमीच कसून मेहनत घेणाऱ्या रोहितच्या या पुनरागमनामुळे चाहत्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे.



## जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा धडाका; लक्ष्य, उन्नती विजयी, ट्रीसा-गायत्री उपउपांत्यपूर्व फेरीत





नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतात सुरू असलेल्या BWF जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी सुरू आहे. पुरुष एकेरीत लक्ष्य सेन, महिला एकेरीत उन्नती हुड्डा यांनी विजयी सलामी देत दुसरी फेरी गाठली आहे. तर महिला दुहेरीतील ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीने थेट उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. मंगळवारी झालेल्या पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत 14वा मानांकित लक्ष्य सेनला ऑस्ट्रियाच्या कॉलिन्स व्हॅलेंटाईन फिलिमॉनने पहिल्या गेममध्ये चांगलेच अडचणीत आणले. फिलिमॉनने पहिला गेम 21-16 असा जिंकला. मात्र लक्ष्यने परिस्थिती झटपट बदलत पुढील दोन्ही गेममध्ये 21-8, 21-4 अशी बाजी मारली. 45 मिनिटांच्या या सामन्यात शानदार पुनरागमन करत लक्ष्यने दुसरी फेरी गाठली. आता त्याची लढत अमेरिकेच्या गॅरेट टॅनशी होणार आहे. महिला एकेरीत 18 वर्षीय उन्नती हुड्डाने म्यानमारच्या थेट हतार थुझारचा 22-20, 21-16 असा पराभव करत आपल्या पहिल्याच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजयी सुरुवात केली. उन्नतीने 40 मिनिटांच्या लढतीत संयमी खेळ करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिची पुढील लढत कॅनडाच्या 13व्या मानांकित मिशेल लीशी होणार आहे. महिला दुहेरीत मात्र ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद जोडीने शानदार विजय मिळवला. बिगरमानांकित भारतीय जोडीने 16व्या मानांकित अमेरिकेच्या लॉरेन लॅम-ॲलिसन ली जोडीचा 21-15, 21-12 असा सरळ गेममध्ये पराभव केला. या विजयामुळे त्यांनी स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले.

मिश्र दुहेरीत भारताला मात्र धक्के बसले. रोहन कपूर-रुत्विका शिवानी गड्डे तसेच अशिथ सूर्या-अमृता प्रमुथेश या जोड्यांना पराभव पत्करावा लागला. अशिथ-अमृता यांचा सामना विशेष रंगला; दुसऱ्या गेममध्ये 29-30 असा गोल्डन-पॉइंटपर्यंत गेलेला संघर्ष पाहायला मिळाला. दरम्यान, ध्रुव कपिला-तनिषा क्रास्टो या 15व्या मानांकित भारतीय जोडीचे आव्हान अजून कायम आहे. पहिल्या फेरीत बाय मिळाल्यानंतर ही जोडी दुसऱ्या फेरीत मकाऊच्या लिआंग लोक चोंग-वेंग चो एनजी जोडीशी भिडणार आहे. 17 ते 23 ऑगस्टदरम्यान नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये ही 30वी जागतिक अजिंक्यपद स्पर्धा होत असून, घरच्या मैदानावर भारतीय खेळाडूंकडून पदकाची मोठी अपेक्षा आहे.

# लक्ष्य सेनला पराभवाचा धक्का; उन्नती हुडाचेही आव्हान संपुष्टात

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था



भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनला बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पराभवाला सामोरे जावे लागले. पुरुष एकेरीच्या ३२ खेळाडूंच्या फेरीत सेन अमेरिकेच्या ज्युनियर क्रमवारीत अव्वल असलेल्या गॅरेट टॅनकडून २१-१९, १९-२१, १७-२१ असा पराभूत झाला. लक्ष्यचे स्पर्धेतून बाहेर पडणे हा भारतासाठी एक मोठा धक्का आहे, कारण त्याच्याकडून पदकाच्या मोठ्या अपेक्षा होत्या. उन्नती हुडाची बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील पहिलीच वाटचाल दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आली. तिला कॅनडाच्या मिशेल लीकडून कडवी झुंज देऊन पराभव पत्करावा लागला. १८ वर्षीय भारतीय बॅडमिंटनपटूने आपल्यापेक्षा उच्च मानांकित असलेल्या कॅनेडियन प्रतिस्पर्ध्याला पराभूत करण्याच्या अगदी जवळ पोहोचली होती. पण इंदिरा गांधी क्रीडा संकुलात एका तासापेक्षा कमी वेळ चाललेल्या सामन्यात तिला २१-११, ९-२१, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला.

तनिषा क्रास्टो आणि ध्रुव कपिला या मिश्र दुहेरीच्या जोडीने मकाऊच्या लिओंग येओक चोंग आणि एनजी वेंग ची यांना २१-११, २१-११ असे पराभूत करून उप उपांत्यपूर्व फेरी गाठली. भारतीय पुरुष दुहेरीची जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी बीडब्ल्यूएफ जागतिक चॅम्पियनशिपच्या उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सात्विक आणि चिराग यांना त्यांच्या पहिल्या सामन्यात वॉकओव्हर मिळाला. दरम्यान, आयुष शेट्टी आणि पी. व्ही. सिंधू यांनी सरळ गेम्समध्ये विजय मिळवत उप उपांत्यपूर्व फेरीपूर्वीच्या फेरीत धडक मारली. आयुषने पुन्हा एकदा दमदार कामगिरी करत पुरुष एकेरीच्या फेरीत श्रीलंकेच्या दुमिंदू अबेविक्रमाचा अवघ्या २६ मिनिटांत २१-८, २१-१० असा पराभव केला. तर पी. व्ही. सिंधूनेही कॅनडाच्या वेन यू झांगचा २१-१६, २१-१७ असा पराभव करून स्पर्धेच्या पुढील फेरीत प्रवेश केला. आयुष आणि सिंधू यांच्या विजयांमुळे एकेरीच्या स्पर्धांमध्ये भारताचे आव्हान कायम राहिले, मात्र लक्ष्य आणि उन्नती यांच्या पराभवामुळे यजमान देशासाठी हा दिवस संमिश्र ठरला.

# भारतीय महिलांचा विश्वचषकात धडाका; दक्षिण आफ्रिकेचा 6-1 ने धुव्वा, पुढची फेरी जवळपास निश्चित

■ ॲम्स्टेलवीन : वृत्तसंस्था

FIH महिला हॉकी विश्वचषकात भारतीय महिला संघाने दमदार कामगिरी करत दक्षिण आफ्रिकेचा तब्बल 6-1 असा पराभव केला. मंगळवारी झालेल्या पूल-D मधील दुसऱ्या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत दक्षिण आफ्रिकेवर वर्चस्व गाजवलं. या विजयासह भारताने दोन सामन्यांतून 4 गुण मिळवत पूल-D मध्ये अव्वल स्थान पटकावलं असून, पुढील फेरीतील प्रवेश जवळपास निश्चित केला आहे. भारतीय संघाने सामन्यात तब्बल सहा वेगवेगळ्या खेळाडूंकडून गोल नोंदवत आपली आक्रमक ताकद दाखवून दिली. सुनेलिता टोप्पोने 11व्या मिनिटाला भारताचं खातं उघडलं. त्यानंतर नवनीत कौरने 17व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचं रूपांतर गोलमध्ये करत भारताची आघाडी 2-0 केली. पुढे सुशीला चानूने 25व्या मिनिटाला गोल करत भारताला 3-0 अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या दुसऱ्या सत्रातही भारतीय खेळाडूंचा आक्रमक पवित्रा कायम राहिला. दीपिकाने 38व्या मिनिटाला शानदार टॉमहॉक शॉटद्वारे चौथा गोल केला. त्यानंतर लालरेम्सियामीने 44व्या मिनिटाला पाचवा गोल करत भारताचा विजय जवळपास निश्चित केला. अवघ्या एका मिनिटानंतर साक्षी राणाने 45व्या मिनिटाला गोल करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. दक्षिण आफ्रिकेकडून अखेरीस कायला डी वॉलने पेनल्टी कॉर्नरवर एकमेव गोल केला. विशेष म्हणजे, हा महिला हॉकी विश्वचषकाच्या इतिहासातील भारताचा सर्वात मोठा विजय ठरला आहे. यापूर्वी 1974 मध्ये भारताने स्पेनचा 4-1 असा पराभव केला होता. यंदाच्या स्पर्धेत मात्र भारतीय संघाने त्यापेक्षाही मोठा विजय मिळवत इतिहास रचला आहे. भारताने स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात बलाढ्य चीनला 2-2 बरोबरीत रोखलं होतं. आता भारताचा पूलमधील अखेरचा सामना 20 ऑगस्टला इंग्लंडविरुद्ध होणार आहे. भारताला पुढील फेरीत पोहोचण्यासाठी या सामन्यात किमान एक गुण, म्हणजेच बरोबरी पुरेशी ठरणार आहे. दरम्यान, पूल-D मध्ये चीनने इंग्लंडचा 4-2 असा पराभव केल्यामुळे भारत आणि चीन प्रत्येकी 4 गुणांवर आहेत. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताचा निकाल पुढील फेरीतील स्थान निश्चित करण्यात महत्त्वाचा ठरणार आहे.

### पुरुषांच्या सामन्याकडेही लक्ष

■ दरम्यान, पुरुषांच्या हॉकी विश्वचषकात आज, 19 ऑगस्टला भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येणार आहेत. इंग्लंडकडून 2-4 असा पराभव झाल्यानंतर भारतासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या खात्यावर 3 गुण असून पाकिस्तान आणि वेल्स प्रत्येकी 1 गुणांवर आहेत. भारताला पुढील फेरीतील स्थान निश्चित करण्यासाठी किमान बरोबरीची गरज आहे, तर पाकिस्तानला स्पर्धेतील आव्हान कायम ठेवण्यासाठी विजय आवश्यक आहे. महिलांच्या संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मिळवलेला विक्रमी विजय आणि पुरुषांच्या संघासमोर उभं ठाकलेलं भारत-पाकिस्तानचं हायव्होल्टेज आव्हान यामुळे भारतीय हॉकी चाहत्यांसाठी विश्वचषकाचा थरार आणखी वाढला आहे.



# दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना चेपॉक स्टेडियमवर खेळवण्यात येणार

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दुलीप ट्रॉफी २०२६-२७ चा अंतिम सामना आता बंगळूरु येथील सेंटर ऑफ एक्सलन्स (CoE) ऐवजी चेन्नई येथील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाईल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अंतिम सामन्याचे ठिकाण बदलण्याचा निर्णय घेतला. या स्पर्धेतील विजेतेपदाचा सामना ६ ते १० सप्टेंबर दरम्यान खेळला जाईल. बीसीसीआयने सांगितले की, अंतिम सामना चेन्नईला हलवण्यामागील मुख्य कारण म्हणजे स्टेडियमवर जास्तीत जास्त प्रेक्षकांना सामना पाहता यावा. सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये प्रेक्षकांच्या संख्येवर काही निर्बंध आहेत, त्यामुळे मंडळाने अंतिम सामन्यासाठी एक मोठे आणि प्रेक्षकांसाठी सोयीस्कर ठिकाण निवडले आहे.

दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्याव्यतिरिक्त, इतर सर्व सामने सेंटर ऑफ एक्सलन्समध्येच खेळवले जातील. स्पर्धेची सुरुवात २३ ऑगस्ट रोजी पूर्व विभाग-ईशान्य विभाग आणि उत्तर विभाग-पश्चिम विभाग सामन्यांनी होईल. सेंटर ऑफ एक्सलन्सच्या मैदानावर प्रेक्षकांना परवानगी नाही. गेल्या हंगामात सर्व सामने प्रेक्षकांशिवाय खेळले गेले होते. यावेळीही, पूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकात सर्व सामन्यांचा समावेश आहे. मात्र, बंगळूरू दौऱ्यादरम्यान, बोर्ड सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले होते की, विजेतेपदाचा सामना प्रेक्षकांसह दुसऱ्या ठिकाणी आयोजित केला जाऊ शकतो.

दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्याच्या स्थळात नुकत्याच झालेल्या बदलाच्या पार्श्वभूमीवर, सैकिया म्हणाले की, ही कॅलेंडरमधील एक प्रमुख प्रथम-श्रेणी स्पर्धा आहे आणि तिचा एक मोठा वारसा आहे. क्रिकेटचा दर्जा उच्च राहतो आणि चाहत्यांना तो स्टेडियममधून थेट पाहायचा असतो. ते पुढे म्हणाले, "सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये प्रेक्षकांच्या उपस्थितीवर काही निर्बंध आहेत. आम्हाला वाटले की अंतिम सामना अशा ठिकाणी हलवणे अधिक चांगले होईल, जिथे चाहते येऊन या कार्यक्रमाचा भाग होऊ शकतील. आम्ही स्पर्धेचे कव्हरेजही वाढवले आहे आणि दुलीप ट्रॉफीचे सर्व सामने थेट प्रक्षेपित केले जातील. एक उपांत्यपूर्व फेरीचा, एक उपांत्य फेरीचा आणि अंतिम सामना टीव्हीवरही उपलब्ध असेल."

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# तुकाराम मुंढेंच्या धडक मोहिमेनंतरही आष्टीत दूध भेसळीचे रॅकेट सक्रिय ; दुधात भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरसह वाहन जप्त

**आष्टी | प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून संपूर्ण महाराष्ट्रात अन्न व दूध भेसळखोरांवर धडक कारवायांचा बडगा उचलला आहे. राज्यभरात भेसळखोरांचे धाबे दणाणले असताना, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात मात्र भेसळखोरांना कोणाचाही वचक उरलेला नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नुकताच आष्टी तालुक्यात दुधात भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरचा मोठा साठा पोलिसांनी जप्त केला असून, या पावडरची वाहतूक करणारी एक पिकअप गाडी ताब्यात घेत तीन आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे तालुक्यात दूध भेसळीचे काळे साम्राज्य अजूनही खुलेआम सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यापूर्वीदेखील आष्टी तालुक्यामध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या पथकांनी विविध ठिकाणी धाडी टाकल्या होत्या. त्या धाडींमध्ये संशयित दुधाचे अनेक नमुने गोळा करून तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्या तपासणी अहवालांचे पुढे नेमके काय झाले? संबंधित अहवाल सकारात्मक आले की नकारात्मक? आणि दोषींवर काय कायदेशीर कारवाई झाली? याबाबत प्रशासनाकडून आजतागायत कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवर होणाऱ्या या कारवाया केवळ कागदोपत्री आणि 'थातूरमातूर' असल्याचा संशय नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे. वारंवार कारवाया होऊनही आष्टीमध्ये भेसळीसाठी लागणारे साहित्य कुठून आणले जाते, हा मोठा प्रश्न आहे. थातूरमातूर कारवायांचा दिखावा न करता दूध भेसळखोरांवर आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार कठोर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

एकीकडे आयुक्त तुकाराम मुंढे हे संपूर्ण राज्यातून भेसळ हद्दपार करण्यासाठी कठोर पावले उचलत असताना, दुसरीकडे आष्टी तालुक्यात राजरोसपणे दुधात भेसळ करणारी पावडर सापडत असल्याने बीड जिल्हा अन्न व औषध प्रशासनाच्या संशयास्पद कार्यपद्धतीवर सर्वसामान्य नागरिक थेट बोट ठेवत आहेत.

आयुक्त मुंढे यांनी राज्यातील पानटपऱ्यांवर विक्री होणाऱ्या गुटखा, सुगंधी पानमसाला आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, आष्टीत दुधातील भेसळयुक्त पावडर पकडल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तालुक्यात तपासणीसाठी येणार असल्याची माहिती मिळताच परिसरातील सर्व पानटपऱ्या अचानक बंद झाल्याचे पाहायला मिळाले. तपास अधिकारी येण्याआधीच ही माहिती संबंधितांपर्यंत कशी पोहोचली आणि दुकाने कोणाच्या सांगण्यावरून बंद झाली, यावरून प्रशासकीय यंत्रणेच्या संगनमताबाबत नागरिकांमध्ये तीव्र संशय व्यक्त होत आहे.




# नात्यातील लोकांनी केलेला अपमान आणि त्याची किंमत! : डॉ. सुवर्णा कराड

माणूस आयुष्यभर नाती जपतो. आई-वडील मुलांसाठी आयुष्य खर्ची घालतात, त्यांच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी आणि सुखासाठी अनेक त्याग करतात. मुलगा मोठा होतो, लग्न होते आणि कुटुंबाचा विस्तार होतो. या नव्या कुटुंबाकडून आई-वडिलांना फार मोठ्या अपेक्षा नसतात; त्यांना हवी असते ती आपुलकी, दोन प्रेमाचे शब्द आणि सन्मानाने जगण्याची जागा. परंतु याच वयात मुलगा किंवा सून त्यांच्याशी अपमानास्पद वर्तन करू लागले तर त्या वेदनेची तीव्रता वेगळीच असते. कारण हा अपमान परक्या व्यक्तीकडून नसतो; तो त्या व्यक्तींकडून असतो ज्यांच्यासाठी त्यांनी आयुष्यभर स्वतःला झिजवलेले असते.



**■ १. आई-वडिलांचा मुलगा आणि सुनेकडून होणारा अपमान :**

वृद्ध आई-वडिलांना मुलाने मोठे झाल्यानंतर आपल्याला आधार द्यावा, अशी स्वाभाविक अपेक्षा असते. मात्र काही कुटुंबांमध्ये वय वाढल्यानंतर त्यांच्याशी चिडचिड करणे, त्यांचे मत न विचारणे, इतरांसमोर कमी लेखणे, त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणे किंवा घरातील निर्णयांमध्ये त्यांना परकेपणाची जाणीव करून देणे असे प्रकार घडतात. काही वेळा मुलगा स्वतः अपमान करतो; काही वेळा सुनेच्या वर्तनामुळे आई-वडिलांना दुःख होते; तर काही प्रसंगी मुलगा परिस्थिती समजून न घेता पत्नीच्या बाजूने उभा राहतो. अशा वेळी आई-वडिलांना केवळ शब्दांचा अपमान सहन करावा लागत नाही, तर आपल्या मुलाशी असलेले भावनिक नातेही जखमी होते.

**■ २. आयुष्यभराच्या त्यागाची अशीच परतफेड असावी का ?**

आई-वडिलांनी मुलाला वाढवताना केलेल्या प्रत्येक त्यागाची परतफेड मुलाने करावी, अशी व्यवहाराची अपेक्षा नसते. पालकत्व हे व्यवहाराचे नाते नाही. परंतु त्यागाची परतफेड म्हणून नव्हे, तर माणुसकी म्हणून वृद्ध आई-वडिलांना सन्मान मिळणे अपेक्षित असते. ज्यांनी मुलाच्या आजारपणात रात्र जागून काढली, शिक्षणासाठी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या आणि त्याच्या भविष्यासाठी अनेक संधी सोडल्या, त्यांनाच पुढे "तुम्ही आमच्यासाठी काय केले?" अशा स्वरूपाचे प्रश्न ऐकावे लागणे ही त्यांच्या मनाला खोलवर जखम करणारी गोष्ट असते.

**■ ३. जवळच्या माणसाचा अपमान अधिक का बोचतो:**

परक्या व्यक्तीने केलेला अपमान माणूस काही प्रमाणात दुर्लक्षित करू शकतो. परंतु मुलाने केलेला अपमान आई-वडिलांसाठी सहज विसरणे कठीण असते. कारण त्या नात्यात आठवणी असतात, त्याग असतो आणि मुलाच्या बालपणापासून जोडलेली भावनिक गुंतवणूक असते. मुलगा मोठा झाला म्हणून आई-वडिलांचे मन त्याच्यापासून मोठे होत नाही. त्यामुळे मुलाच्या एका कठोर वाक्यालाही अनेक वर्षांच्या आपलेपणाची पार्श्वभूमी असते.

**■ ४. सुनेशी नाते आणि सन्मानाचा प्रश्न :**

सुना ही कुटुंबाचा महत्त्वाचा भाग असते. सासू-सासरे आणि सून यांच्यातील नाते परस्पर आदर, संवाद आणि समजुतीवर आधारलेले असेल तर घरातील वातावरणही निरोगी राहते. मात्र मतभेद झाले की एकमेकांना कमी लेखणे, टोमणे मारणे किंवा अधिकाराच्या संघर्षात अपमान करणे सुरू झाले तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. सून म्हणून तिच्या स्वाभिमानाचा आदर आवश्यक आहे; त्याचप्रमाणे सासू-सासरे म्हणून वृद्ध आई-वडिलांचाही सन्मान आवश्यक आहे. आदर हा एका बाजूचा अधिकार नसून दोन्ही बाजूंची जबाबदारी आहे.

**■ ५. अपमानाची खरी किंमत :**

अपमानाची किंमत पैशात मोजता येत नाही. वृद्ध आई-वडिलांसाठी ती एकटेपणात, मनातील दुःखात आणि मुलाविषयीच्या बदललेल्या भावनेत मोजावी लागते. घरात राहूनही आपण या घरात परके आहोत, अशी भावना निर्माण झाली तर त्यापेक्षा मोठी वेदना कोणती? काही पालक मुलाला त्रास होऊ नये म्हणून शांत राहतात. ते उत्तर देत नाहीत, वाद घालत नाहीत आणि अनेक गोष्टी मनातच ठेवतात. त्यांचे हे मौन कधी कधी परिस्थिती स्वीकारल्याचे नसते; ते मुलावरील प्रेम आणि घर टिकवण्याची शेवटची धडपड असते.

**■ ६. नाते टिकवताना आत्मसन्मान कुठे ठेवायचा?**

आई-वडिलांनी मुलांसाठी अनेक गोष्टी सहन केल्या म्हणून आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यातही अपमान सहन करत राहणे आवश्यक नाही. मुलांवर प्रेम असणे आणि स्वतःचा सन्मान जपणे या दोन गोष्टी एकमेकांच्या विरोधात नाहीत. शांतपणे आपली भूमिका सांगणे, दुखावणारे वर्तन स्पष्टपणे नाकारले जाणे आणि आवश्यक तेथे काही मर्यादा निश्चित करणे हेही नात्याचा भाग आहे. पालकांनी मुलांपासून प्रेम तोडण्याची गरज नाही; मात्र अपमानाला सामान्य मानण्याचीही गरज नाही.

**■ ७. मुलाची भूमिका सर्वांत महत्त्वाची :**

आई-वडील आणि पत्नी यांच्यात मतभेद झाले तर मुलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. एका बाजूला झुकून दुसऱ्या बाजूला कमी लेखण्याऐवजी परिस्थिती समजून घेणे, संवाद घडवून आणणे आणि प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण करणे आवश्यक असते. पत्नीचा सन्मान राखणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आई-वडिलांच्या वृद्धत्वाचा आणि भावनांचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. कुटुंबात शांतता निर्माण करण्याची जबाबदारी कोणत्याही एका व्यक्तीवर नसली तरी मुलाची समतोल भूमिका अनेक संघर्ष टाळू शकते.

**■ ८. मौनाची ताकद आणि मर्यादा :**

प्रत्येक अपमानाला लगेच प्रत्युत्तर देणे आवश्यक नसते. कधी मौन हे संयमाचे लक्षण असते. परंतु सतत अपमान होत असताना मनात वेदना साठवत राहणेही योग्य नाही. योग्य वेळी शांतपणे संवाद साधणे आवश्यक आहे. "तुमच्या या वागण्यामुळे आम्हाला दुःख होते" एवढे साधे वाक्यही अनेकदा नात्याला आरसा दाखवू शकते. संवादातून बदलाची शक्यता असेल तर ती संधी द्यावी; परंतु बदलाची इच्छा नसेल तर स्वतःच्या मानसिक शांततेसाठी अंतर ठेवण्याचाही विचार करता येतो.

**■ ९. अंतर म्हणजे नाते तोडणे नव्हे :**

मुलगा किंवा सून सतत अपमान करत असेल तर आई-वडिलांनी प्रत्येक वेळी संघर्ष करण्याची आवश्यकता नाही. काही वेळा अपेक्षा कमी करणे, व्यवहारापुरता संपर्क ठेवणे किंवा स्वतंत्रपणे राहण्याचा निर्णय घेणे हा अधिक शांततापूर्ण मार्ग असू शकतो. याचा अर्थ मुलाविषयीचे प्रेम संपले असे नसते. आई-वडिलांच्या मनात मुलासाठी प्रेम कायम राहू शकते; मात्र त्या प्रेमाबरोबर स्वतःचा सन्मानही जपता येतो.

**■ १०. अपमान करणाऱ्यापेक्षा अपमान सहन करणाऱ्याची किंमत ओळखणे :**

वृद्ध आई-वडिलांचा सन्मान हा त्यांच्या आर्थिक योगदानावर किंवा घरातील उपयोगितेवर अवलंबून नसावा. त्यांनी आयुष्यभर काय कमावले, किती पैसा दिला किंवा घरासाठी किती काम केले यापेक्षा ते या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती आहेत, ही जाणीव महत्त्वाची आहे. वृद्धत्वामध्ये माणसाला सर्वाधिक गरज असते ती सुरक्षिततेची, आपलेपणाची आणि आदराची. घरातील चार भिंती पुरेशा नसतात; त्या घरात सन्मानाने जगता येणे आवश्यक असते.

**■ ११. स्वतःची किंमत दुसऱ्याच्या वर्तनाने ठरत नाही :**

मुलगा किंवा सून आपल्याला कमी लेखत असेल तर त्यातून आई-वडिलांची किंमत कमी होत नाही. आयुष्यभर केलेले कर्तृत्व, दिलेले संस्कार आणि जगलेले जीवन एखाद्या कठोर वाक्यामुळे शून्य होत नाही. म्हणून अपमान झाल्यानंतर स्वतःला दोष देत बसण्यापेक्षा परिस्थितीकडे शांतपणे पाहणे आवश्यक आहे. मुलाच्या वर्तनामुळे स्वतःच्या अस्तित्वाची किंमत ठरू देऊ नये.

**■ समारोप :**

आई-वडिलांनी मुलांना जन्म दिला, वाढवले आणि स्वतःच्या आयुष्याचा मोठा भाग त्यांच्या भविष्यासाठी दिला. त्याबदल्यात त्यांना संपत्तीची नव्हे, तर माणुसकीची अपेक्षा असते. मुलगा आणि सून यांनी आई-वडिलांशी मतभेद ठेवू नयेत असे नाही; परंतु मतभेदांच्या नावाखाली अपमान होऊ नये. तसेच आई-वडिलांनीही मुलांच्या नव्या आयुष्याचा आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे आवश्यक आहे. नाते टिकवण्याचा सर्वोत्तम मार्ग एकमेकांवर अधिकार गाजवणे नसून एकमेकांचा सन्मान करणे हा आहे. वृद्ध आई-वडिलांना आधार देणे ही केवळ जबाबदारी नाही; त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाची मानवी जाणीव आहे. कारण शेवटी घर मोठे असण्यापेक्षा त्या घरात आई-वडिलांना सन्मानाने जगता येणे अधिक महत्त्वाचे आहे.

**- डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र.**

# ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी

२१ ऑगस्ट रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' साजरा केला जातो. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील प्रश्न, त्यांच्या गरजा, समाजातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने या दिवसाला विशेष महत्त्व आहे. हा दिवस केवळ ज्येष्ठांचा गौरव करण्याचा किंवा त्यांना शुभेच्छा देण्याचा दिवस नसून, वृद्धत्वाकडे समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो का आणि त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक सामाजिक वातावरण उपलब्ध आहे का, याचा विचार करण्याची संधी आहे. आयुष्यभर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वृद्धावस्थेत सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक आधार, कौटुंबिक आपुलकी आणि सामाजिक सन्मान मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजावरील ओझे नसून अनुभव, ज्ञान, संस्कार आणि सामाजिक स्मृतीची अमूल्य संपत्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे दयेच्या नव्हे, तर मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि नागरिकांच्या प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

वृद्धत्व हा मानवी जीवनाचा स्वाभाविक टप्पा आहे. बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व या जीवनप्रवासातील नैसर्गिक अवस्था आहेत. वय वाढले म्हणून व्यक्तीची मानवी प्रतिष्ठा, नागरिकत्व किंवा मूलभूत अधिकार कमी होत नाहीत. शरीराची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते; परंतु जीवनानुभव, ज्ञान, कौशल्य, विवेक आणि सामाजिक भान यांचे मूल्य कमी होत नाही. उलट अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे अनेक दशकांचा अनुभव असतो. कुटुंब, शेती, शिक्षण, उद्योग, प्रशासन, साहित्य, कला, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान समाजाच्या जडणघडणीचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणून वृद्धत्वाला दुर्बलतेचे प्रतीक मानण्याऐवजी अनुभव आणि ज्ञानाच्या समृद्धीचा टप्पा म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ व्यक्तींना आदर देण्याची दीर्घ परंपरा आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेत आजी-आजोबा आणि कुटुंबातील इतर ज्येष्ठ व्यक्ती हे घरातील अनुभवाचे आणि संस्कारांचे केंद्र असत. मुलांच्या संगोपनात त्यांचा सहभाग असे. लोककथा, इतिहास, परंपरा, संस्कृती, जीवनमूल्ये, स्थानिक ज्ञान आणि कुटुंबाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ज्येष्ठ करत असत. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे संयुक्त कुटुंबव्यवस्था कमी झाली. रोजगार आणि शिक्षणासाठी तरुणांचे स्थलांतर वाढले. शहरीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे कुटुंबातील परस्पर संवादाचे स्वरूप बदलले. परिणामी अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात, तर काही जण कुटुंबासोबत असूनही भावनिक एकाकीपणाचा अनुभव घेतात. या बदलत्या परिस्थितीत ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते.

ज्येष्ठ नागरिकांचा सर्वांत मूलभूत अधिकार म्हणजे सन्मानाने जगण्याचा अधिकार होय. वय वाढले म्हणून एखाद्या व्यक्तीचे मत, अनुभव किंवा निर्णयक्षमता संपत नाही. घरातील निर्णयांमध्ये ज्येष्ठांचा सहभाग असणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ व्यक्तीलाही स्वतःचा स्वाभिमान असतो. तिच्या प्रत्येक गरजेकडे उपकार म्हणून पाहणे चुकीचे आहे. 'आता तुमचे वय झाले आहे', 'तुम्हाला काही समजत नाही' किंवा 'तुम्ही आमच्यावर अवलंबून आहात' अशा मानसिकतेतून ज्येष्ठांना कमी लेखणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आघात करणारे आहे. ज्येष्ठांची सेवा ही उपकाराची नव्हे, तर कृतज्ञतेची आणि सामाजिक जबाबदारीची भावना असली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांमध्ये सुरक्षिततेचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. वृद्ध व्यक्तींना




शारीरिक हिंसा, मानसिक छळ, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, फसवणूक आणि मालमत्तेवर बेकायदेशीर दबाव यांपासून संरक्षण मिळाले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार अनेकदा घराच्या चार भिंतींच्या आत घडतात. कौटुंबिक प्रतिष्ठा, नातेसंबंध आणि समाजाच्या प्रतिक्रियेच्या भीतीमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. काही वेळा अत्याचार करणारी व्यक्तीच त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारी असल्यामुळे ज्येष्ठांना विरोध करणे कठीण जाते. त्यामुळे त्यांना विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था, कायदेशीर मार्गदर्शन आणि सामाजिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

आहे. ज्येष्ठ नागरिकांनी अन्याय सहन करणे ही संस्कृती बदलली पाहिजे.

भारतामध्ये पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा या संदर्भातील महत्त्वाचा कायदा आहे. ज्येष्ठ नागरिकांना भरणपोषण आणि आवश्यक आधार मिळावा, त्यांची उपेक्षा होऊ नये आणि त्यांच्या कल्याणासाठी संस्थात्मक व्यवस्था उपलब्ध व्हावी, हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. मात्र कायदा असणे आणि तो गरजू नागरिकांपर्यंत पोहोचणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ग्रामीण भागातील, अशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती अनेकदा नसते. त्यामुळे कायदेशीर साक्षरता वाढविणे आणि तक्रार निवारणाची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. हक्कांची माहिती असणे हीच हक्कांच्या संरक्षणाची पहिली पायरी आहे.

आर्थिक सुरक्षितता हा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा आधार आहे. संघटित क्षेत्रातील काही व्यक्तींना निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन किंवा इतर आर्थिक साधनांचा आधार मिळतो; परंतु असंघटित क्षेत्रातील अनेक कामगार वृद्धावस्थेत नियमित उत्पन्नाविना राहतात. शेतमजूर, लघु शेतकरी, घरगुती कामगार, कारागीर, छोटे व्यावसायिक आणि इतर असंघटित कामगारांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात; परंतु वृद्धापकाळासाठी पुरेशी आर्थिक तरतूद झालेली असेलच असे नाही. महागाई, औषधोपचाराचा खर्च आणि दैनंदिन गरजा यामुळे त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. म्हणून वृद्धापकाळातील सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्यसुरक्षा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सुलभ आणि पारदर्शक




पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे.

आरोग्याचा अधिकार हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. वाढत्या वयाबरोबर नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार, तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, आपत्कालीन उपचार आणि पुनर्वसनाच्या सुविधांची आवश्यकता वाढते. ग्रामीण भागातील ज्येष्ठांना आरोग्यसेवा मिळविण्यासाठी लांब अंतर पार करावे लागणे, वाहतुकीचा अभाव किंवा उपचाराचा खर्च परवडत नसणे अशा अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्यसेवा यंत्रणेत ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विशेष विचार केला पाहिजे. आरोग्यसेवा ही दया नसून सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत गरज आहे. ज्येष्ठ नागरिकांना उपचार घेताना सन्मानजनक वर्तन आणि योग्य माहिती मिळणेही तितकेच आवश्यक आहे.

शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्यालाही समान महत्त्व दिले पाहिजे. निवृत्तीनंतर दैनंदिन जीवनातील भूमिका बदलतात. मुलांचे स्थलांतर, जोडीदाराचे निधन, मित्रपरिवार कमी होणे, सामाजिक सहभाग घटणे आणि एकाकीपणा यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. काही ज्येष्ठ नागरिकांना आपले जीवन निरर्थक झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी कुटुंबीयांनी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या भावना ऐकून घेणे, त्यांना घरातील निर्णयांमध्ये सहभागी करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याचा अधिकार म्हणजे उपचार मिळण्यापुरता मर्यादित नसून प्रेम, आपलेपणा, भावनिक आधार आणि सन्मानाचे वातावरण मिळण्याचा अधिकारही आहे.

मालमत्ता आणि संपत्तीशी संबंधित हक्क हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील अत्यंत संवेदनशील विषय आहे. आयुष्यभराच्या कष्टातून मिळविलेले घर, जमीन, बचत किंवा इतर संपत्ती ही वृद्धावस्थेतील सुरक्षिततेचा आधार असते. काही वेळा भावनिक दबाव, फसवणूक किंवा चुकीची माहिती देऊन ज्येष्ठांकडून मालमत्ता हस्तांतरित करून घेतली जाते. त्यानंतर त्यांची उपेक्षा किंवा छळ केला जातो. त्यामुळे मालमत्तेशी संबंधित निर्णय घेताना ज्येष्ठांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी आणि आवश्यक कायदेशीर माहिती मिळणे गरजेचे आहे. ज्येष्ठांच्या मालमत्तेवर हक्क मिळविण्यापेक्षा त्यांच्या सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचार महत्त्वाचा आहे. मालमत्तेच्या प्रश्नावरून ज्येष्ठ व्यक्तीला घरातच असुरक्षित वाटू लागणे ही अत्यंत गंभीर सामाजिक विसंगती आहे.

ज्येष्ठ महिलांच्या हक्कांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडलेल्या अनेक महिलांकडे स्वतःच्या नावावर पुरेशी आर्थिक साधने नसतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. ग्रामीण भागातील वृद्ध महिलांना आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवास, आर्थिक सहाय्य आणि कायदेशीर माहिती मिळविताना अधिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्येष्ठ महिलांना त्यांच्या मालमत्ता हक्कांची, आर्थिक योजनांची, आरोग्यविषयक सुविधांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती देणे आवश्यक आहे. वृद्ध महिला ही केवळ कुटुंबाची सेवा करणारी व्यक्ती नसून स्वतंत्र अधिकार असलेली नागरिक आहे, ही जाणीव समाजात दृढ झाली पाहिजे.



# लातूर ग्रामीण मतदार संघातील चौदा देवस्थानांना आ. कराड यांच्या प्रयत्नातून तीर्थक्षेत्राचा "क" दर्जा

**लातूर | प्रतिनिधी**

लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील चौदा देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा "क" दर्जा प्राप्त झाला आहे. "क" दर्जा प्राप्त झाल्याने त्या त्या गावातील देवस्थानाचा सर्वांगीन विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकास कामांना मान्यता देण्यात आली असून लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी या बैठकीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा "क" दर्जा देऊन भाविक भक्तांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या मागणीनुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील श्री सच्चिदानंद महाराज देवस्थान भादा ता. औसा, श्री खंडोबा मंदिर भाडगाव ता. लातूर, श्री काशीविश्वेश्वर मंदिर दगडवाडी ता. लातूर, श्री महादेव मंदिर मुशिराबाद ता. लातूर, श्री बाळूमामा देवस्थान ममदापूर ता. लातूर, श्री जगदंबा मंदिर सलगरा बु. ता. लातूर, बाराइमामा देवस्थान उमरगा ता. लातूर, श्री हनुमान मंदिर भातांगळी ता. लातूर, श्री जगदंबा मंदिर बामणी ता. लातूर, श्री खंडोबा मंदिर सलगरा खू. ता. लातूर, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर रमजानपूर ता. लातूर, श्री हनुमान मंदिर काटगाव ता. लातूर, श्री संत माधव मामा ज्ञानेश्वरी संस्थान मठ पानगाव, ता. रेणापूर, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान जवळा बु, ता. लातूर अशा एकूण चौदा विविध देवस्थानचा शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल एकोणीस विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकास योजनेचा "क" दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

# भाजपा किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी अ‍ॅड दिलीप करपे यांची निवड

## मुंडे साहेबांपासून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांस ना. पंकजाताई मुंडेंनी दिली संधी



**बीड | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी केज येथील शेतीनिष्ठ शेतकरी अ‍ॅड दिलीप करपे यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यामुळे अ‍ॅड करपे यांना प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे.

किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार किसान मोर्चाची प्रदेश कार्यकारिणी नुकतीच जाहीर केली, यात उपाध्यक्ष म्हणून जवळबन ता. केज येथील अ‍ॅड दिलीप करपे यांची निवड करण्यात आली आहे. अ‍ॅड करपे हे व्यवसायाने वकिल असून शेतीवर त्यांचे प्रचंड प्रेम आहे. अंबाजोगाई येथे नुकतेच त्यांनी सेंद्रीय शेती उत्पादन विक्रीचे शॉप सुरू केले आहे. विशेष म्हणजे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या काळापासून ते पक्ष संघटना व नेतृत्वाशी जोडले गेलेले आहेत, शेतीवरील त्यांची आवड व निष्ठा पाहून ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांना किसान मोर्चावर काम करण्याची संधी दिली, या निवडीबद्दल अ‍ॅड करपे यांनी ना.पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

# कुकडीचे वाहून जाणारे ओव्हरफ्लोचे पाणी सीना व मेहकरी धरणात पूर्ण क्षमतेने सोडा माजी आमदार बाळासाहेब आजबे यांची मागणी

**आष्टी | प्रतिनिधी**

कुकडी प्रकल्पाचे ओव्हरफ्लो होऊन वाया जाणारे पाणी तातडीने भोसे खिंड बोगद्यातून सीना धरणात आणि तिथून पुढे मेहकरी धरणात सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी केली आहे. हे पाणी वेळेत मिळाल्यास आष्टी तालुक्यातील ३० ते ४० गावांचा पाण्याचा गंभीर प्रश्न सुटू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. जर प्रशासनाने हा प्रश्न तातडीने मार्गी लावला नाही, तर मेहकरी आणि परिसरातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

आष्टी तालुक्यात सध्या दुष्काळी परिस्थितीची गडद सावट असून आगामी काळात मोठ्या प्रमाणावर तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. या संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी कुकडीचे ओव्हरफ्लोचे पाणी मेहकरी धरणात पोहोचणे अत्यंत गरजेचे बनले आहे. मात्र, सध्या कुकडीवरून सीना धरणात सोडण्यात आलेले पाणी अतिशय कमी दाबाने वाहत आहे. मूळ ठिकाणाहून १५० क्युसेक वेगाने



पाणी सोडले जात असले तरी सीना धरणापर्यंत केवळ ५० ते ६० क्युसेक पाणीच पोहोचत आहे. भोसे येथील बोगद्याजवळ पंप लावून शेतकऱ्यांकडून जवळपास १०० क्युसेक पाणी उचलले जात असल्याने ही तूट निर्माण होत आहे. परिणामी, गेल्या २० दिवसांपासून पाणी सुरू असूनही सीना धरणाच्या पाणीसाठ्यात केवळ ६ टक्क्यांचीच वाढ झाली आहे.

सध्या कुकडीचे पाणी मोठ्या प्रमाणावर ओव्हरफ्लो होऊन पुढे वाहून जात आहे. हे वाया जाणारे पाणी पूर्ण दाबाने सीना आणि मेहकरी धरणात वळवल्यास संभाव्य दुष्काळाच्या काळात आष्टी तालुक्यातील अनेक गावांना मोठा दिलासा मिळणार आहे. भविष्यात दुष्काळाची तीव्रता वाढल्यास या भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मेहकरी धरणातील साठ्यावरच अवलंबून असणार आहे.

या गंभीर विषयाबाबत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली असून, जलसंपदा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशीही पाठपुरावा सुरू आहे. याशिवाय हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे मांडून पाणी मिळवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पाण्याचा प्रवाह तात्काळ वाढवावा, अन्यथा रस्त्यावर उतरून लढा दिला जाईल, असे आजबे यांनी नमूद केले.

# शिवभक्तीचा महासागर! परळीत 'हर हर महादेव'च्या जयघोषात भव्य कावड यात्रा संपन्न

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

'हर हर महादेव', 'बंम बंम भोले' आणि शिवशंभोच्या गगनभेदी जयघोषात, अद्भूत भक्ती आणि मंगलमय वातावरणात परळी वैजनाथ येथे भव्य कावड यात्रा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. धर्मवीर सामाजिक युवा प्रतिष्ठान संचलित श्री वैद्यनाथ भक्ती मंडळ, परळी वैजनाथ तर्फे या भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे संपूर्ण परळी नगरी शिवभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली होती.

- **गोदावरी मातेच्या पूजनाने प्रारंभ**

कावड यात्रेची सुरुवात सकाळी सूर्योदयाच्या पवित्र मुहूर्तावर झाली. दक्षिण गंगा म्हणून विशेष अध्यात्मिक मान्यता असलेल्या गोदावरी नदीची साडी-चोळी अर्पण करून आणि मनोभावे ओटी भरून नदीचे पूजन करण्यात आले. यानंतर पवित्र जल घेऊन कावड धारकांनी प्रभू वैद्यनाथाच्या दिशेने प्रस्थान केले. कावड धारकांची अथांग भक्ती आणि शिस्त पाहून उपस्थित जनसमुदाय मंत्रमुग्ध झाला होता.

- **हजारो महिलांचा भक्तीभाव आणि तुळशी वृंदावन**

साधारणपणे दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ही भव्य यात्रा स्टेशन रोड परिसरात दाखल झाली. या ठिकाणी यात्रेचे स्वरूप अधिकच विलोभनीय झाले, जेव्हा हजारो महिला भाविक भक्तीभावाने यात्रेत सामील झाल्या. अनेक महिलांच्या डोईवर पवित्र तुळशी वृंदावन होते, तर अनेक महिला विविध पारंपरिक वाद्ये वाजवत प्रभू वैद्यनाथाच्या भक्तीत पूर्णपणे तल्लिन झाल्या होत्या.

- **प्रभू वैद्यनाथ चरणी यात्रा विलीन**

दुपारी चारच्या सुमारास ही कावड यात्रा स्टेशन रोडवरून पुढे सरकत राणी लक्ष्मीबाई मनोरा, नेहरू चौक आणि तळ परिसर मार्गक्रमण करत प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पवित्र गाभाऱ्यात पोहोचली. प्रभू वैद्यनाथाच्या चरणी जलाभिषेक करून या भव्य आणि नयनरम्य यात्रेची सांगता झाली.

- **सामाजिक बांधिलकीची प्रचिती**

अतिशय नियोजनबद्ध आणि शांततेत पार पडलेल्या या धार्मिक उपक्रमामुळे 'धर्मवीर सामाजिक युवा प्रतिष्ठान संचलित श्री वैद्यनाथ भक्ती मंडळ' यांच्या उच्च सामाजिक बांधिलकीची आणि व्यवस्थापनाची प्रचिती पुन्हा एकदा संपूर्ण परळीकरांना आली. या अभूतपूर्व सोहळ्याची चर्चा आता संपूर्ण जिल्ह्यात होत असून, भक्तांनी प्रतिष्ठानच्या या कार्याचे मनापासून कौतुक केले आहे.

"शिवशंभोचा हा अद्भूत सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला!" अशा प्रतिक्रिया यावेळी उपस्थित शिवभक्तांनी दिल्या.

